903cc

जा.क्र.माध्य-3/प्रथम मान्यता/पुवि/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १. यांचे कार्यालय,
दिनांक :- 22 AUG 2000

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक] पुणे
जिल्हा परिषद ____________

विषय :- प्रथम मान्यता
श्रीयोग माध्यमिक विद्यालय बेटवाडी, ता. दौंड

संदर्भ :- आपले पत्र क्र.शिक्षण/माध्य/८-४/प्रथम मान्यता/९९-२०००
दिनांक ७. ३. २०००

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये श्रीयोग शिक्षण संस्था, बेटवाडी ता. दौंड संस्थेच्या श्रीयोग माध्यमिक विद्यालय बेटवाडी, ता. दौंड या माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/ ९ वी १० वी च्या वर्गास १९९९-२००० या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे यांची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे या बाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमांप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३] पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१४]
१५]

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १.

प्रत- मुख्याध्यापक श्रीयोग माध्यमिक विद्यालय बेटवाडी ता. दौंड

Scanned with OKEN Scanner